डिसेंबर २०००

# पतसंस्थां परिवार हे मुंबई शहरातील सहकाराचे खरे व्यासपीठ

'पतसंस्था परिवार' या मासिकाचा पहिला अंक आम्ही प्रसिध्द केला.त्याला वाचकांनी उदंड प्रतिसाद दिला त्याबद्दल आम्ही सर्वाचे आभारी आहोत.तसे पत्राकारिता क्षेत्र हे माझ्यासाठी नवे आहे.त्यामुळे पाहिल्या अंकातील चुका माझ्या मते नाहीत व झाल्या असल्या तरी वाचकांनी हितचिंतकांनी त्या योग्य प्रकारे मानून घेतल्या आहेत.अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात मोठ्या नेत्यांनी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल आम्ही सहकारातील सर्वच नेत्यांचे आभारी आहोत. यावेळी अनेक वक्त्यांनी जी सहकार चळवळीविषयी भाषणे केली. त्यातील प्रत्येक गोष्टीचे आम्ही बारकाईने वाचन करुन ती प्रत्यक्षात अंमलात आणण्याचे ठरविले आहे. यावेळी सोपानराव बोऱ्हाडे यांनी 'पतसंस्था परिवार' च्या रुपाने आम्हाला खरे व्यासपीठ मिळाले आहे. बी.एम.ठोकळसाहेबांनी सुधारणा व अडीअडचणी यांचे व्यासपीठ मिळाले उपलब्ध झाल्याचे सांगितले. चंद्रकांत खोपडे यांनी सहकार्याचे आवाहन करुन आम्हाला एक प्रकारे प्रोत्साहन दिले आहे. जयश्री पांचाळ यांनी महिलांना खरे व्यासपीठ मिळाल्याचे सांगितले. उत्तमराव सांवत , वसंतराव शिंदे तसेच रघुवीर सामंत यांनी सहकारी चळवळ व खास मुंबईचे जीवन म्हणजे पतसंस्था व त्यासाठी 'पतसंस्था परिवार' हे मासिक सुरु केल्याने पतसंस्थांच्या विविध समस्या नक्कीचसुटतील त्यांच्या अडचणीसाठी 'पतसंस्था परिवार' हे खरेव्यासपीठ उभे राहिले आहे. नंदकुमार काटकर यांनी तर २५ वर्गणीदार देण्याचे जाहीर करुन आम्हाला सहकार्य केले आहे. ५ ते ६ हजार सभासद करण्याचे आमचे६ महिन्यांचे उद्दीष्ट या मुळे पुर्ण होणार आहे. त्याबद्दल आम्ही संर्वाचे ऋणी आहोत. आम्हाला या मासिकासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्व कार्यकर्त्यांचे पुन्हा एकदा आभार ! सहकारासाठी खरे व्यासपीठ निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न नक्कीच करणार ही आमची ग्वाही नव्हे तरती प्रतिज्ञाच आम्ही आज घोषीत केली आहे.!!

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!